International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.2 Nov – Dec 2021

# वाङ्•मयेतिहास लेखन - प्रेरणा

**डॉ. सहस्रबुद्धे भारती मिलिंद**

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉमर्स आणि

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आर्टस् कॉलेज, नाना पेठ, पुणे 2.

**प्रस्तावना :-**

'वाङ्•मयेतिहास' हा भूतकाळात निर्माण झालेल्या साहित्याचा आराखडा असतो. परंतु वाङ्•मयेतिहास हा केवळ घडलेल्या घटनांचा नसून त्या गोष्टींवर कोणकोणत्या गोष्टींचा प्रभाव पडलेला असतो हे त्या वाङ्•मयेतिहासात असायला हवे. म्हणजे त्या वाङ्•मय निर्मितीवर कशाचा प्रभाव आहे, ते वाङ्•मय नेमके कोणत्या काळात निर्माण झाले आहे. त्या काळाच्या धारणा प्रेरणा काय होत्या, त्या काळात कोणकोणत्या सांस्कृतिक घटना घडलेल्या आहेत. याचा आढावा वाङ्•मयेतिहासकार आपल्या वाङ्•मयेतिहास लेखन घेत असतो. नाहीतरी त्याला या गोष्टींचा आढावा घ्यावा लागतो म्हणजे त्या काळातील सामाजिक, राजकीय, धार्मिक स्थिती काय होती याचा आढावा वाङ्•मयेतिहास लेखनात घेतला जातो. वाङ्•मयेतिहास लिहिताना त्या काळातील समाज व संस्कृतीचा अभ्यास करावा लागतो. वाङ्•मय हे सुद्धा संस्कृतीचाच एक भाग आहे, यावर भाष्य करताना द. दि. पुंडे म्हणतात की, "संस्कृती हीच वाङ्•मय वृक्षाच्या मुलाला जीवनरस पुरवत असते. त्यामुळे वाङ्•मयात सळसळणाऱ्या चैतन्याची ओळख पटवून घेण्यासाठी सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या शोधाकडे वळणे अपरिहार्य ठरते"(1) वाङ्•मय ज्या काळात निर्माण होते त्या काळातील धारणा प्रेरणा त्या वाङ्•मयातून डोकावत असतात. एकूणच जे वाङ्•मय ज्या काळात निर्माण झाले त्या काळाचा अभ्यास वाङ्•मयेतिहासकाराला करावा लागतो, किंवा त्याचा वेध वाङ्•मयेतिहासकार आपल्या वाङ्•मयेतिहासलेखणात घेत असतो. वाङ्•मयाबरोबरच जर कालखंडाचा वेध वाङ्•मयेतिहासात घेतला नाहीतर तो वाङ्•मयाचा इतिहास होणार नाही.

वाङ्•मय निर्मिती कोणत्या कालखंडात झाली? त्या काळातील राजसत्ता कोणाची होती? त्या काळातील वाङ्•मयनिर्मितीच्या प्रेरणा काय होत्या? त्या काळातील वाङ्•मय प्रकार, वाङ्•मय प्रवाह कोणते होते? त्या काळातील वाङ्•मय निर्मितीच्या धारणा प्रेरणा काय होत्या? इत्यादी प्रश्नांचा उहापोह वाङ्•मयेतिहासकार आपल्या वाङ्•मयेतिहासात घेत असतो. वाङ्•मय ही एक कला आहे व वाङ्•मय निर्माता एक कलावंत असतो. त्यामुळे वाङ्•मय निर्माता लेखक यांच्या चरित्राची माहिती वाङ्•मयेतिहासलेखणात असायला पाहिजे. त्यामुळे त्या साहित्याच्या धारणा प्रेरणा व प्रकृती यांची माहिती समजायला मदत होते. याचाही वेध वाङ्•मयेतिहासकाराने वाङ्•मयेतिहास लेखणात घेतला पाहिजे. यावर अशोक केळकर म्हणतात की, " साहित्त्येतिहासामध्ये केवळ इतिहास कथन असू नये, त्याचबरोबर परिचयाचाही समावेश असावा. म्हणून साहित्त्येतिहासाला जोडूनच त्या त्या कालखंडातील

साहित्याचा परिचय करून देणाऱ्या वेच्यांचे संग्रह तयार केले जाणे आवश्यक आहे. फ्रेंच भाषेत अशी वेचे देण्याची पद्धत आहे."(2)

मराठी वाड्•मयेतिहासलेखनाच्या स्वरूपाचा विचार केल्यास. इ. स.1200 ते 2000 पर्यंत 800 वर्षाच्या कालावधीतील वाड्•मयाचा वाड्•मयेतिहास लिहिलेला आहे. या कालखंडाचे अनेक कालखंड ही दिसतात. परंतु त्यामध्ये ठळक दोन कालखंड आपल्याला दिसतात. त्यामध्ये प्रारंभ ते 1818 पर्यंतचा मध्ययुगीन कालखंडाचा वाड्•मयेतिहास व दुसरा इ. स. 1800 ते इ. स. 2000 पर्यंतचा अर्वाचीन किंवा आधुनिक वाड्•मयाचा कालखंड कल्पिला जातो. मध्ययुगीन वाड्•मयाचा वाड्•मयेतिहास हा आधुनिक किंवा अर्वाचीन काळात लिहिलेला दिसतो. यामुळे या वाड्•मयाचे वाड्•मयेतिहासलेखणासाठी अनेक मर्यादा आहेत. वाड्•मय उपलब्ध नसणे, हस्तलिखिते न मिळणे तत्कालीन अनेक गोष्टींचा उलगडा होत नाही. या वाड्•मयाच्या तुलनेत अर्वाचीन किंवा आधुनिक कालखंडातील वाड्•मयेतिहासलेखन करणे सोपे काम आहे.

**वाड्•मयेतिहासलेखनाच्या प्रेरणा :-**

वाड्•मयेतिहासलेखनाची सुरवात 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात झालेली दिसते. ब्रिटिशांनी आधुनिक शिक्षण आणले, त्यात इथला मराठी माणूस शिकला. शिकल्यानंतर तो इथल्या संस्कृतीचा भाषेचा अभ्यास करू लागला. आतून वि. ल. भावे यांनी माध्ययुगीन साहित्याचा वाड्•मयेतिहास लिहिला. या लेखनाची प्रेरणा ही राष्ट्रीय होती असे म्हणता येईल. काही अभ्यासक व संशोधक यांनी स्वबळावर संशोधन करून वाड्•मयेतिहासाचे लेखन केलेले दिसते. त्यामध्ये अ. ना. देशपांडे, ह. श्री. शेणोलीकर, ल. रा. नसिराबादकर इ. लेखकांनी वाड्•मयेतिहास लिहिलेला दिसतो. यांच्या लेखानाची प्रेरणा ही संशोधन व मराठी भाषा व संस्कृतीचा अभ्यास ही असलेली दिसते. मराठी भाषा व वाड्•मय यांच्या अभिमानातून महाराष्ट्रात अनेक संस्था स्थापन झाल्या. त्यामध्ये 'महाराष्ट्र साहित्य परिषद' या भाषा व वाड्•मयाच्या अभ्यास संस्थेने मराठी भाषेचा व साहित्याचा सात खंडात रूपांतरित वाड्•मयेतिहास लिहिलेला दिसतो.

**समारोप :-**

एकूणच मराठी वाड्•मयेतिहासलेखनाच्या अनेक प्रेरणा आहेत. त्यात भाषा व संस्कृतीच्या अभिमानापोटी लिहिलेला वाड्•मयेतिहास दिसतो. तसेच भाषेचा अभ्यास व संशोधन करण्याच्या लालसेपोटीही वाड्•मयेतिहासलेखन झालेले दिसते. भाषेचा व संस्कृतीचा अभिमान व अभ्यास याही वाड्•मयेतिहासलेखनाच्या प्रेरणा दिसतात.

**संदर्भ :-**

1) द. द. पुंडे, 'वाड्•मयेतिहास : आठ निबंध', प्रतिमा प्रकाशन, पुणे 2003, पृ. क्र. 47

2) त त्रै व पृ. क्र. 202